**निशाणी क्र.५७**

| MHTH270082282023 | |
|---|---|
| | दाखल तारीख : २५.०९.२०२३ |
| | नोंदणी तारीख : २५.०९.२०२३ |
| | निकाल तारीख : १०.१०.२०२५ |
| | कालावधी : वर्षे ०२ महिने ०० दिवस १५ |

**<u>अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, जिल्हा ठाणे यांच्या न्यायालयात</u>**
**(पिठासीन आधिकारी : पी. अे. साने)**

| | | |
|---|---|---|
| | | **स्पेशल पोक्सो खटला क्रमांक ८६६/२०२३** |
| | | गुन्हा रजि. क्र.३२५/२०२३<br>पोलीस स्टेशन रबाळे, नवी मुंबई |
| **फिर्यादी** | **:** | **महाराष्ट्र शासन** |
| | | फिर्यादीकरिता श्री. योगेंद्र पाटील, अतिरिक्त सरकारी वकील |
| **आरोपी** | : | श्याम आप्पाजी पाटील<br>वय-३८ वर्षे, धंदा - नोकरी<br>राहणार- खोली क्र.ई/२२३, सिम्पलेक्स<br>गणेशकृपा सोसायटी, सेक्टर-०७,<br>घनसोली, नवी मुंबई |
| | | आरोपीतर्फे वकील श्री राहूल मिश्रा |

| | | |
|---|---|---|
| गुन्हाची तारीख | : | जानेवारी २०२२ ते ०१.०७.२३ |
| प्रथम खबरीची तारीख | : | दिनांक ०७.०७.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | : | दिनांक २८.०८.२०२३ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | दिनांक १३.०६.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा नोंदवायला सुरुवात झाल्याची तारीख | : | दिनांक २२.०७.२०२५ |
| निकालपत्र राखून ठेवल्याची तारीख | : | ...... |
| निकालपत्राची तारीख | : | दिनांक १०.१०.२०२५ |
| शिक्षा सुनावली असल्यास त्याची तारीख | : | नाही. |

## आरोपीचा तपशील

| अनुक्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामिनावर सुटका झाल्याची तारीख | दोषारोप निश्चितीचे कलमे | निर्दोष मुक्ती की शिक्षा फर्मावली | फर्मावलेली शिक्षा | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये शिक्षेतून मिळालेल्या सूट चा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | श्याम आप्पाजी पाटील | ०८.०७. २०२३ | जेलमध्ये | भा.दं.वि कलम ३७६, ३७६ (२)(एफ), ३७६ (२)(एन), ३२३, ५०६. पोक्सो कायदा कलम ४, ८, १२ | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |

## अ. अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयाने स्वत:हून तपासलेल्या साक्षीदारांची यादी

| | अभियोगपक्ष | |
|---|---|---|
| **अनुक्रमांक** | **नांवे** | **पुराव्याचे स्वरुप** |
| सा.क्र.१ | ''अ'' निशाणी १८ | पिडीत |
| सा.क्र.२ | ''म'', निशाणी २२ | साक्षीदार |
| सा.क्र.४ | राजीव प्रभुदास लोले निशाणी २७ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | किरण गुलाबराव पाटील निशाणी ४७ | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.६ | बाळासाहेब हेमराज शिंदे निशाणी ५२ | तपासी अंमलदार |
| | **बचावपक्ष** | |
| | निरंक | |
| | **न्यायालयाचा साक्षीदार** | |
| | निरंक | |

**ब.**

| | **अभियोगपक्षाच्या निशाण्या** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निशाणी २१ | पिडीत मुलीचा फौ.प्र.संहिता कलम १६४ जबाब |
| २ | निशाणी २८ | घटनास्थळ पंचनामा, हातनकाशा |
| ३ | निशाणी २९ | मुद्देमाल पावती |
| ४ | निशाणी ३० | लाईट बील |
| ५ | निशाणी ३१ | पीडीतेला वैद्यकीय तपासणीला पाठवलेले पत्र |
| ६ | निशाणी ३२ | वैद्यकीय तपासणीचा रीपोर्ट |
| ७ | निशाणी ३३ | मोबाईल संभाषण रेकॉर्डींग पंचनामा |
| ८ | निशाणी ३४ व ३५ | मोबाईल, पेनड्राईव्ह जप्त मुद्देमाल पावती |
| ९ | निशाणी ३६ | व्हॉईस सॅम्पल पंचनामा |
| १० | निशाणी ३८ | दिनांक २९.०७.२०२३ चे पत्र |
| | **बचावपक्षाच्या निशाण्या** | |
| | | निरंक |
| | **न्यायालयाच्या निशाण्या** | |
| १ | निशाणी ०९ | दोषारोप |
| २ | निशाणी ५६ | आरोपीचा फौ.प्र.संहिता कलम ३१३ चे निवेदन |

## क. मुद्देमाल वस्तू :

| | **अभियोगपक्ष** | |
|---|---|---|
| | निरंक | |

| बचावपक्ष | | |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>न्यायनिर्णय</u>**
( दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी जाहीर )

०१. आरोपीवर भारतीय दंड विधान कलम ३७६, ३७६ (२)(एफ), ३७६ (२)(एन), ३२३, ५०६ आणि लैगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पौक्सो) कलम ४, ७ आणि १२ प्रमाणे दोषारोप आहे.

०२. फिर्यादी पक्षाची केस थोडक्यात अशी की,

कुमारी भ अज्ञान जी यातील आरोपीची मुलगी आहे हिने दिनांक ७/०७/२०२३ ला पोलीसांना रिपोर्ट दिला की, ती ११ वी मध्ये प्रवेश घेणार असून तिचे वडील हे प्रिटींग प्रेस मध्ये काम करतात. तर तिची आई हाउुसकिंपीगचे काम करते. जानेवारी २०२२ मध्ये तिची आई व भाऊ त्याच्या काकाच्या घरी विटावा येथे गेले असताना ती व तिचे वडील असे एकटेच घरी होते. संध्याकाळी सहा वाजता तिच्या वडीलांनी जबरदस्तीने तिचे कपडे काढले व लैगिंग अत्याचार केला व वडीलांनी तिला कोणाला सांगितले तर ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे तिने तो प्रकार कोणालाही सांगितला नाही. ती दिनांक २१/०६/२०२३ ला तिच्या वडीलांच्या त्रासाला कंटाळून मित्रीणीच्या घरी निघून गेली. त्यामुळे तिने सदरचा प्रकार आपल्या आईला सांगितला. दिनांक ०१/०७/२०२३ रोजी सकाळी आठ वाजता तिचे वडील तिच्याशी जबरदस्ती करू लागले व तिचा नग्न अवस्थेत व्हिडीओ केला व पुन्हा तिला जीवे मारण्याची धमकी देवून लैंगिक अत्याचार केला. त्याप्रमाणे तिने दिलेल्या रिर्पोटवरून गुन्हा क्रमांक ३२५/२०२३ दाखल करण्यात आला.

०३. तपासामध्ये तपासी अंमबलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा बनवला. साक्षीदाराचे जाबजवाब नोंदवले. कपडे जप्त केले. आरोपीचा मोबाईल हस्तगत केला. फिर्यादीची वैदयकीय तपासणी केली. आरोपीची देखील वैदयकीय तपासणी केली व त्याच्या तपासामध्ये आरोपीने देखील गुन्हा केल्याचे निष्पण झाल्याने त्याच्या विरूद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

०४. अभियोग पक्षाने आरोपी वरील दोषारोप सिध्द करण्याच्या कामी साक्षीदार तपासले.

०५. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदवण्यात आले असून त्याचा बचाव की त्याने काही एक गुन्हा केलेला नाही.

०६. आरोपीने आपले बचावाच्या कामी काही एक साक्षी पुरावा दिलेला नाही.

०७ उभयबाजूचा युक्तीवाद ऐकला.

०८. सरकार पक्षाची केस, त्याचा पुरावा, उलटतपास, आरोपीने दिलेली कलम ३१३ मधील प्रश्नांची उत्तरे व उभयबाजूचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारातील उपस्थित झाले असून मी त्याचे निष्कर्ष मी त्याच्यासमोर खालील दिलेल्या कारणमीमांसेवरुन नोंदविलेले आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, जानेवारी २०२० ते दिनांक ०१.०७.२०२३ या | |

| | | |
|---|---|---|
| | कालावधीमध्ये खोली क्र.ई/२२३, सीम्पलेक्स गणेश कृपा सोसायटी, सेक्टर ०७, घनसोली, नवी मुंबई येथे अज्ञान मुलीच्या संमतीशिवाय तिच्यावर बलात्कार केला आणि त्यामुळे आरोपीने भा.द.वि. कलम ३७६ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने त्याच्या अज्ञान मुलीवर तिच्या संमतीशिवाय बलात्कार केला आणि त्यामुळे आरोपीने भा.द.वि.कलम ३७६(२)(एफ) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने त्याच्या अज्ञान मुलीवर तिच्या संमतीशिवाय वारंवार बलात्कार केला आणि त्यामुळे आरोपीने भा.द. वि.कलम ३७६(२)(एन) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ४ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने त्याच्या अज्ञान मुलीला वर नमूद घटनेदरम्यान नकार दिल्याने तिला मारहाण केली त्यामुळे आरोपीने भा.द.वि. कलम ३२३ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ५ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने त्याच्या अज्ञान मुलीला वर नमूद घटनेदरम्यान नकार दिल्याने तिला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्यामुळे आरोपीने भा.द.वि. कलम ५०६ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ६ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद वेळेस, तारखेस व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या अज्ञान मुलीवर भेदक लैंगिक | |

| | | |
|---|---|---|
| | अत्याचार केला, त्यामुळे आरोपीने पोक्सो कलम ४ अन्वये आणि कलम ८ शिक्षपात्र गुन्हा केला ? | नाही. |
| ७ | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद वेळेस, तारखेस व ठिकाणी आरोपीने त्याच्या अज्ञान मुलीचा लैंगिक छळ करुन जबरदस्तीने लैंगिक प्रवेश केला, त्यामुळे आरोपीने पोक्सो कलम १२ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ८ | काय आदेश ? | आरोपीला दोषमुक्त करण्यात येत आहे. |

**कारणमीमांसा**

**मुददा क्र.०१ ते ०७ बाबत :**

०९. वरील मुद्यांच्या संदर्भात एकत्र चर्चा केलेली आहे.

१०. अभियोग पक्षाच्या केस प्रमाणे यातील आरोपी याने यातील फिर्यादी हिच्या वरती लैंगिक अत्याचार केला अशी अभियोग पक्षाची केस आहे.

११. सदर पिडीत मुलगी ही पोक्सो कायदा कलम २ ड प्रमाणे ती बालक आहे हे अभियोग पक्षाने साबित करावयाचे आहे. या ठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, साक्षीदार क्रमांक १ पिडीत मुलगी हिने आपल्या तोंडी पुराव्यामध्ये आपली जन्म तारीख ११/०२/२००८ अशी आहे असे सांगितलेले आहे. सदरची बाब या कामी आरोपीद्वारे विवादास्पद करण्यात आलेली नाही. सबब साक्षीदार क्रमांक १ ही बालक या संज्ञेमध्ये येत आहे व तिचे वय वर्ष १८ पेक्षा कमी आहे याबाबत देखील तिचा जन्म तारखेचा दाखला निशाणी ४१ येथे आहे. सबब सदरची बाब ही शाबीत होते.

१२. पिडीत मुलगी हिचा तोंडी पुरावा निशाणी १८ येथे असून तिने आरोपी हे तिचे वडील आहे हे सांगितलेले असून, जानेवारी २०२२ मध्ये आरोपीने तिच्याशी शारीरिक जबरदस्तीने अत्याचार केले ही बाब तिने नाकारलेली आहे. तसेच तिने डॉक्टरांना देखील आरोपीने तिच्यावरती शारीरिक अत्याचार केलेल्याचे सांगितले नाही असे सांगितले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास अभियोग पक्षातर्फे घेण्यात आला. परंतु तिच्या उलट तपासामध्ये अभियोग पक्षाला सहाय्यभुत असे काही आले नाही. पुढे असे देखील नमुद करावसे वाटते की, तिने मोबाईल मधील संभाषण हे आरोपीचे आहे हे नाकारलेले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये तिने मान्य केले की, आरोपीने तिच्या वर काही एक लैगिंक अत्याचार केलेला नाही.

१३. आरोपीद्वारे युक्तीवाद करण्यात आला की, सदर पिडीत मुलीचा पुरावा हा अभियोग पक्षाच्या केसला पुरक नाही. सदरची बाब ही अभियोग पक्षाला हानिकारक आहे.

१४. साक्षीदार क्रमांक २ आरोपीचे पत्नी आणि पिडीत मुलीची आई हिचा तोंडी पुरावा निशाणी २२ येथे आहे. तिच्या पुराव्याचा विचार करिता तिने देखील अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तिने, आरोपीने पिडीत मुलीशी जबरदस्तीने शारीरिक संबंध केले व तिचे नग्न अवस्थेतील फोटो/व्हिडीओ काढला हे नाकारले आहे. अभियोगपक्षाने तिचा उलट तपास घेतला त्यात अभियोग पक्षाच्या केस ला पुष्टी देणा-या काही एक बाबी आलेल्या नाही. सदर साक्षीदाराचा आरोपीकडून उलटतपास घेण्यात आला. त्या मध्ये तिने मान्य केले की, आरोपीने तिच्या मुलीवरती कधीही लैंगिक अत्याचार केलेला नाही व गैरसमजूतीतून केस केलेली आहे.

१५. साक्षीदार क्रमांक ३ बाळासाहेब शिंदे निशाणी २६, साक्षीदार

क्रमांक ४ तपासी अंमलबलदार राजु लोले, निशाणी २७, साक्षीदार क्रमांक ५ किरण पाटील व साक्षीदार क्रमांक ६ बाळासाहेब शिंदे या साक्षीदारांच्या पुराव्याचा विचार करिता हे सर्व साक्षीदार पोलीस अधिकारी आहेत. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे यातील पिडीत मुलीने फिर्याद दिली त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. निशाणी २८ वर घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला, आरोपीचा मोबाईल जप्त करण्यात आला, पिडीत मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तिचा अहवाल निशाणी २० मध्ये असून तो अहवाल आरोपीद्वारे मान्य केलाय व त्या मध्ये ओपीनियन सी.एफ.एल. करिता पेन्डींग ठेवला आहे असे नमूद केलेले आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. व त्याच्या तपासामध्ये यातील आरोपीने गुन्हा केला व साक्षीदाराचे जाबजवाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले असे सांगितलेले आहे परंतु या ठिकाणी असे नमुद करावसे वाटते की, अशा केसेस मध्ये पोक्सो कायदा कलम २९ अन्वये असलेली गृहिते ही विचारात घेण्याकरिता प्रथम अभियोग पक्षाने फाउुन्डेंशनल फॅक्ट शाबीत करावयासे आहे. या अनुषंगाने वर चर्चा केल्याप्रमाणे यातील पिडीत मुलगी हिने आपल्या पुराव्यामध्ये आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध केले व लैगिंक अत्याचार केला ही बाब पुर्णपणे नाकारलेली आहे. तिचा तोंडी पुरावा हा अभियोग पक्षास सहाय्य होत नाही. तसेच साक्षीदार क्रमांक २ तिची आई हिचा देखील तोंडी पुरावा अभियोग पक्षास सहाय्यभुत नाही. मुळ पिडीत मुलीचा पुरावा हा अभियोग पक्षास हानिकारक असल्याने अशा परिस्थीतीमध्ये आरोपीने खरोखर तिच्या वरती बलात्कार केला, तिला मारहाण केली, जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या संदर्भात सबळ पुरावा आलेला नाही. सबब अशा परिस्थतीमध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप हे सबळ पुराव्याद्वारे शाबीत करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरले आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ७ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.०८ बाबत</u> :**

१६. वरील मुद्दा क्रमांक १ ते ७ च्या निष्कर्षावरून आरोपीवरचे दोषारोप सिध्द न झाल्याने त्याला या गुन्हातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे. :

**: <u>आदेश</u> :**

१ आरोपी श्याम आप्पाजी पाटील यांची फौजदार प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७६ ३७६ (२)(एफ), ३७६ (२)(एन), ३२३, ५०६ आणि लैगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पौक्सो) कलम ४, ८ आणि १२ प्रमाणेच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२ सदर आरोपीची इतर गुन्हाच्याकामी आवश्यकता नसल्यास त्यास या गुन्हातून तात्काळ सोडून देण्यात यावे.

३ जप्त मुद्देमाल जप्त मोबाईल, अपीलाची मुदत संपल्यानंतर आरोपीला नियमाप्रमाणे परत करण्यात यावा.

४ यातील जप्त मुदेदमाल, कपडे हे अपीलाची मुदत संपल्यानंतर नाश करण्यात यावे

५ यातील आरोपीने फौ.प्र.सं.कलम ४३७-अ अन्वये रुपये ०५,०००/- वैयक्तीक जात मुचलका आणि तितक्याच रक्कमेचा जामीन देणेचा आहे.

६ सदर निकालपत्राची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ प्रमाणे जिल्हा दंडाधिकारी यांना पाठविण्यात यावी.

७ न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषीत.

सही/---

(पी. अे. साने. )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
बेलापुर, नवी मुंबई

दिनांक -१०.१०.२०२५
बेलापूर